# ।। मदभागी ध्रिग ध्रिगता को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## ।। अथ मद भागी ध्रिग ध्रिग ता को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

**मद भागी संसार मे ।। सो नर कहिये जोय ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। ज्याँ मुख राम न होय ।।१।।**

अनंत युगापासून हंस आवागमनाच्या चक्रात अटकला आहे व अनंत असह्य दुःख भोगून राहीला आहे.या दुःखातून निघण्याकरीता मनुष्य शरीर ही पहिली आवश्यकता आहे व शरीर प्राप्त केल्यानंतर धरतीवर सतगुरु शोधणे ही दुसरी आवश्यकता आहे. सतगुरु शोधल्या नंतर सतगुरुचा शरणा घेऊन घटात सतनाम प्रगट करणे व घटात पूर्वेचे सहा व पश्चिमेचे सहा कमळ छेदन करुन महासुखाचे मोक्ष पद प्राप्त करणे ही तिसरी आवश्यकता आहे.जीवाला मनुष्य देह मिळून गेला व सतगुरु शोधले नाही तर त्याचा मनुष्य देह मिळणे धिक्कार आहे.मनुष्य देह मिळाला व सतगुरु ही मिळून गेले.परंतु सतगुरुचा शरणा घेतला नाही व रामनाम घेऊन घटात रामनाम प्रगट केले नाही तरीही त्या मनुष्य देहाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.असे जीव भाग्यहिन आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,काळाच्या दुःखातून निघण्याकरीता मनुष्याच्या मुखात रामनाम पाहिजे परंतु संसारात मनुष्य देह मिळवून/प्राप्त करुन मुखात रामनाम घेत नाही ते सर्व स्त्री–पुरुष भाग्यहीन आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व संसाराला सांगून राहीले आहे.।।१।।

**नर देही नर पाय कर ।। नांव रटे नही कोय ।।**
**तांकु सुखराम के ।। ध्रग जमारो होय ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,नर देह प्राप्त करुन रामनामाचे रटन करत नाही.अशा स्त्री,पुरुषाच्या मनुष्य देहाला धिक्कार आहे,धिक्कार आहे हे सर्व जगाचे स्त्री–पुरुष ऐका. ।।२।।

**ध्रक ध्रक वा नर देह रे ।। ध्रक ध्रक वां की जात ।।**
**तांमे सुण सुखराम के ।। नही भजन की बात ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,ज्या जातीत नर देह प्राप्त करुन राम–नामाच्या भजनाची गोष्ट करता येत नाही.त्या जातीला तसेच नर देहाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.हे जगाचे स्त्री–पुरुष ऐका. ।।३।।

**भजन बिना नर फिरत हे ।। ते नर पशु समान ।।**
**हर तजे सुखराम के ।। ध्रक पूजे जे आंन ।।४।।**

जसे जगात कित्येक जीव पशु पक्षी बनून येतात व संसार करतात व इकडे तिकडे फिरतात

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

परंतु दुर्भाग्याने काळाच्या दु:खातून निघण्याकरीता(उबरण्या)रामनाम घेऊ शकत नाही असेच जगात कित्येक जीव मनुष्य देह प्राप्त करतात व मनुष्य देह प्राप्त करुन रामनाम घेऊ शकतात परंतु घेत नाही,असे रामनाम घेता येणारे भाग्यवान मनुष्य जीव व न घेता येणारे भाग्यहीन पशुपक्षीचे जीव एकसारखे आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाच्या स्त्री–पुरुषांना सांगतात.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जे स्त्री–पुरुष काळापासून मुक्त करविणाऱ्या हरला त्यागून देतात व काळाच्या मुखात ढकलणाऱ्या अंबा,मुंबा,काली,पितर,भोपा, मोगा,खेतपाळ इत्यादी बळी मागणाऱ्या देवतांना पुजतात त्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे. ।।४।।

**समर्थ को सर्णो तजे ।। गहे आन की ओट ।।**
**तांकु सुण सुखराम के ।। ध्रक लानत हे फीट ।।५।।**

आवागमनातून मुक्त करवून देणाऱ्या समर्थ देवाला त्यागून काळाला घाबरुन धुजणारे ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती इत्यादी देवतांचा आश्रय घेतात अशा सर्व स्त्री–पुरुषांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री पुरुषांना ऐकवून राहीले आहे. ।।५।।

**फिको मन हुवे भक्त सुं ।। चर्चा सुण मुर्झाय ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम के ।। हरी गुण सुणे न आय ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की काळाला जिंकून घेतले अशा भक्ताशी मनात प्रितहीन राहतात व त्यांच्याकडून निपजणाऱ्या अणभय देशाच्या ज्ञानाची चर्चा ऐकून नाराज होतात,दु:खी होऊन जातात व त्यांच्याकडून हरीचे गुण ऐकत नाही, समज नाही त्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।६।।

**ध्रक ध्रक वा नर नार हे ।। ज्यारे भक्त न भाव ।।**
**तांकु ध्रक सुखराम के ।। गृह तज बिष को चाव ।।७।।**

ज्या स्त्री–पुरुषांला रामनामाच्या भक्तांशी प्रेमभाव नाही अशा सर्व स्त्री–पुरुषांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.गृहस्थाश्रम त्यागून साधू बनून जातात व साधू बनून विषयरस पितात अशा साधूंना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।७।।

**ध्रक ध्रक वांको जलम हे ।। गृह तज विषया खाय ।।**
**ताकुं ध्रक सुखराम के ।। जन के पास न जाय ।।८।।**

ज्या जीवाने मनुष्य देहात जन्म घेऊन गृहस्थी जीवन स्वीकारले व पुढे चालून गृहस्थी जीवन त्यागुन वैरागी साधू बनतो व गृहस्थी वैरागी बनून गृहस्थी सारखे विषयवासना

भोगतो अशा मनुष्य जन्माला धिक्कार आहे,धिक्कार आहे.जे स्त्री–पुरुष मनुष्य देह प्राप्त करुन सतस्वरुपी साधूजवळ जात नाही.अशा स्त्री–पुरुषांना धिक्कार आहे, धिक्कार आहे. ।।८।।

**मिनष जन्म पाय केरे ।। सिंवरे नही जगदिस ।।**
**ता कुं ध्रक सुखराम के ।। लानत बिश्वा बीस ।।९।।**

मनुष्य देह प्राप्त करुन जगाच्या सर्व आत्मांचा ईश्वर आहे.अशा जगदिशाचे स्मरण करत नाही त्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे आणि शत प्रतिशत लाणत आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले आहे.।।९।।

**घर आश्रम बांध कर ।। संतन पोखे लाय ।।**
**ता कुं ध्रक सुखराम के ।। ध्रक नर जन्म कहाय ।।१०।।**

आश्रम म्हणजे घर बांधून सतस्वरुपी संतांना आपल्या घरी आदराने आणून भोजन प्रसाद देत नाही अशा मनुष्य जन्माला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१०।।

**आत्म मे परमात्मा ।। ता कुं खोजे नाय ।।**
**वा देही सुखराम के ।। ध्रक ध्रक हे जग मांय ।।११।।**

आधीपासून प्रत्येक आत्म्यामध्ये परमात्मा आहे व तो परमात्मा शोधण्याकरीता मनुष्य देह मिळालेला आहे.परंतु त्या मनुष्य देहाने आत्म्यामध्ये परमात्मा शोधत नाही अशा जगाच्या सर्व मनुष्य देहाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।११।।

**परमेश्वर सुं प्रीत नही ।। ग्यान उथापे आय ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम के ।। गुरू द्रोही जग मांय ।।१२।।**

जगात सतगुरु परमेश्वराचे ज्ञान सांगतात परंतु ऐकणाऱ्या स्त्री–पुरुषांना त्या समर्थ परमेश्वराची प्रीती नाही म्हणून परमेश्वराचे ज्ञान ऐकत नाही उलट त्या ज्ञानाचे खंडन करतात असे स्त्री,पुरुष गुरुद्रोही म्हणजे परमेश्वराचे द्रोही आहे हे समजणे.अशा गुरुद्रोहींना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।१२।।

**काछ लंपटी ध्रक हे ।। हे ध्रक झूठा कहे बेण ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम के ।। होय नर बिर्चे सेण ।।१३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो पुरुष,स्त्री लंपट आहे तसेच जे स्त्री–पुरुष खोटे बोलतात त्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.पुढे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे स्त्री–पुरुष सज्जनता करणारे आपल्या सज्जनांशी

मायेच्या मतलबा करीता बदलून जातात अशा स्त्री,पुरुषांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।१३।।

**धक धक ता को जन्म हे ।। बेण पलट होय जाय ।।**
**ता कुं धक सुखराम के ।। वे नर सूंका खाय ।।१४।।**

जे वचन देऊन त्याला पूर्ण करत नाही व त्या वचनांशी बदलूल जातात अशा स्त्री–पुरुषांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.जे स्त्री–पुरुष न्याय करण्यात लाच घेतात व लाच घेऊन खोटा न्याय देऊन अनिती करतात अशा स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१४।।

**करणी कदे न आदरे ।। करमा सु हुंसियार ।।**
**हरी बेमुख सुखराम के ।। से नर सबे गिवार ।।१५।।**

सतस्वरुपी करण्या करणे स्विकार करत नाही व विकारी कुकर्म करण्याकरीता नेहमी हुशार राहतात व हरीशी बेमुख राहतात ते सर्व स्त्री–पुरुष मूर्ख आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१५।।

**मद भागी संसार मे ।। सुणज्यो अे सब होय ।।**
**भेद बिना सुखराम के ।। क्या मुढ ग्यानी लोय ।।१६।।**

ज्याला सतस्वरुप भेद माहीत नाही मग ते स्त्री–पुरुष मुर्ख असो किंवा ज्ञानी असो हे सर्व संसारात भाग्यहिन आहे सर्व लोक ऐकून घ्या असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।१६।।

**भेष पेहेर हरी नही भजे ।। तां कुं फिट धकार ।।**
**फिट लानत सुखराम कहे ।। भेद न लहे गिवार ।।१७।।**

साधुचा वेश धारण करतात व सतस्वरुप हरीचे भजन करत नाही त्याला धिक्कार आहे, फिट आहे,लाणत आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,सतस्वरुपाचा भेद न घेणारे सर्व वेषधारी साधू गवार आहे.।।१७।।

**त्यागी होय ताकीद सुं ।। भजे न अणघड़ देव ।।**
**तां कुं धक सुखराम केहे ।। निजपद लख्या न भेव ।।१८।।**

मोक्ष प्राप्त करण्याकरीता उतावीळ होऊन कुटूंब परीवाराला त्यागून त्यागी बनून जातात व त्यागी होऊन मायेपासून उत्पन्न झालेल्या देवतांना भजतात.मायेच्या पलिकडील अनघड देवाला भजत नाही.अनघड देवाला न भजल्या कारणाने मायामुक्त निजपदाला भेद प्राप्त करत नाही.मायेच्या तीन लोकाच्या पदात अटकून राहतात अशा त्याग्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।१८।।

**सांमी होय सुखराम कहे ।। जोग न साज्या कोय ।।**
**ता कुं ध्रक सुखराम कहे ।। भेष लजायो जोय ।।१९।।**

संसार त्यागून स्वामी होऊन जातात व स्वामी होऊन अनघड स्वामीचा योग साधत नाही.त्रिगुणी मायेचे योग साधतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, अशा स्वामींची मायेचा योग धारण केलेल्या त्यागीचा वेषाला लाजविले आहे.।।१९।।

**आठ पहर शिंवरे नही ।। आद पुरष निर्धार ।।**
**सो आयस सुखराम कहे ।। ध्रक ध्रक इण संसार ।।२०।।**

घरदार ही माया त्यागून आयस म्हणजे मुद्रा घातलेले नाथ बनतात व अष्टोप्रहर आदि मायेचे स्मरण करतात.आयसने माया त्यागली तर आदि पुरुषाचा निर्धार करुन अष्टोप्रहर स्मरण केले पाहिजे होते.तसे न करता स्थूल माया त्यागतात व काळाच्या मुखात ठेवते त्या मूळ मायेला पकडतात म्हणून आयस बनल्यावर त्या आयसला धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।२०।।

**जंगम होय जाचे नही ।। अविनासी निजदेव ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। लहे न आत्म भेव ।।२१।।**

जंगम होऊन जातात व काळ जिचा विनाश करतो.अशा मायेच्या विनाशी देवाला भजतात.काळाचा जो विनाश करतो असा जो अविनाशी देव आत्म्यातच प्रगट आहे त्या अविनाशी निजदेवाला भजत नाही.त्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२१।।

**बेरागी होय ब्रम्ह को ।। ने:चल धरे न ध्यान ।।**
**ता कुं ध्रक सुखराम कहे ।। गृह तज भुक्ते काम ।।२२।।**

गृहस्थी जीवन त्यागतात व वैरागी बनतात.वैरागी बनून वैरागी ब्रम्हचे निश्चल बनून ध्यान करत नाही.मुळ मायेचे ध्यान करतात व आपली स्त्री त्यागून अन्य स्त्रीयांसोबत विषय वासना भोगतात अशा वैरागींना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२२।।

**बेरागी होय राम सुं ।। लिव लगाई नाय ।।**
**गृह तज ध्रक सुखराम कहे ।। फेर बस्ती मे जाय ।।२३।।**

गृहस्थी जीवन त्यागून वैरागी होऊन जातात व मायेपासून मुक्त असे वैरागी रामाशी लिव लावत नाही व मायेपासून उपजलेल्या देवताशी लिव लावतात व आपले घर व आपले गाव सोडून दुसऱ्या गावात पर स्त्री सोबत घर वसवतात अशा वैराग्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२३।।

**जती होय जगदिश कुं ।। तन मन अर्प्या नाय ।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

ता कुं ध्रक सुखराम कहे ।। तज उलटा विष खाय ।।२४।।

तन,मनाने स्त्रीशी घृणा करुन वेगळा होऊन जती बनून जातो व जो अस्सल जती आहे त्या जगदीशला तन,मन अर्पण न करता उलट मूळ मायेत तन,मन लावतात व आपली स्त्री त्यागून अन्य स्त्रियांसोबत विषयरस खातात अशा जतीला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२४।।

**ब्राम्हण होय कर ब्रम्ह को ।। भेद न जाणे कोय ।।**

**ध्रक ध्रक सो सुखराम केहे ।। नांव लजावे जोय ।।२५।।**

ब्राम्हण होऊन सतस्वरुप ब्रम्हचा भेद जाणत नाही.मुळ त्रिगुणी मायेत रचमचलेले राहतात व मुखात ब्रम्ह जाणेल तोच ब्राम्हण असे सांगून स्वत:ला ब्राम्हण नावाने समजतात असे ब्राम्हण,ब्राम्हण या नावाला लाजवितात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२५।।

**ब्राम्हण के घर जन्म रे ।। भजन ब्रम्ह को नाय ।।**

**ता कुं ध्रक सुखराम कहे ।। ब्रम्ह कु वायो काय ।।२६।।**

ब्राम्हणाच्या घरी जन्म घेतो व खरा ब्राम्हण आहे अशा सतस्वरुप ब्रम्हला भजत नाही व स्वत:ला ब्राम्हणाच्या घरात जन्म घेतला म्हणून ब्रम्ह म्हणवितो व सर्व क्रिया, करणी त्रिगुणी मायेपासून उपजलेले ब्रम्हा,विष्णू,महादेव इत्यादी देवतांची करतो अशा ब्राम्हणाच्या घरात जन्मलेल्या स्वत:ला ब्रम्ह म्हणविणाऱ्या ब्राम्हणाला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।२६।।

**ग्यानी होय के ग्यान की ।। राह चले नही कोय ।।**

**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। नीत पलट हुवे लोय ।।२७।।**

ज्ञानी होऊन ज्ञानाच्या रस्त्याने चालत नाही.आपला स्वार्थ येताच ज्ञानाचा रस्त्या त्यागून देतो व पलटलेल्या निच रस्त्याने चालतात अशा ज्ञानी लोकांना धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२७।।

**पन्डत होय निर्पक्ष की ।। करे न चर्चा आय ।।**

**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। जग सुहावत केह जाय ।।२८।।**

निरपक्ष फक्त सतस्वरुप देव आहे.तो अनघड देव आहे.तो आधीपासून सर्व आत्म्या–मध्ये सुख देण्याकरीता प्रगट आहे.असे सर्व आत्म्यामध्ये प्रगट आहे अशा देवाची पंडीत/ब्राम्हण बनल्यावर ब्राम्हण चर्चा करत नाही व वेगवेगळ्या लोकांनी आप आपल्या मनाने मानलेले काळाच्या जबड्यात फसलेल्या देवांची चर्चा करतो अशा पंडीताला धिक्कार आहे,धिक्कार आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे पंडीत जगाच्या जीवाला ज्यात आपले स्वार्थ नाही निभणार अशा परमार्थाचे ज्ञान

सांगत नाही व आपल्या थोड्या स्वार्थाकरीता आतापर्यंत मन ज्या मायेच्या सुखांमध्ये लुभावला जात होता व जातो आहे अशा काळाच्या मुखात ठेवणाऱ्या ज्ञानाला कथतो म्हणून अशा पंडीतांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२८।।

**धक ग्यानी धक भेष सो ।। जे हरी रत्ता नाय ।।**
**धक दुनिया सुखराम केहे ।। से पूजण नही जाय ।।२९।।**

ज्ञानी पंडीत ब्राम्हण,जती,जंगम,सेवडा,वैरागी इत्यादी वेषधारी जे जे हरीमध्ये लिन झाले नाही त्या सर्वांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.तसेच असे सर्व वेषधारी व जगाच्या सर्व स्त्री–पुरुषांना ही धिक्कार आहे.जो सतस्वरुपी साधुला पुजत नाही. ।।२९।।

**नो निधका बासा हुवे ।। अन धन अखत अपार ।।**
**बिण सिंवरण सुखराम कहे ।। धक धक जन्म गिवार ।।३०।।**

घटात नवविधीचा वास आहे म्हणजे अन्न व धन अपार आहे सांगितले जात नाही इतके आहे.परंतु रामनामाचे स्मरण थोडेसेही नाही.अशा गवार स्त्री–पुरुषाच्या जन्माला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३०।।

**बुध भारी हिमत घणी ।। बड़ी अकल तन माय ।।**
**ता कुं धक सुखराम कहे ।। समझर शिंवरे नाय ।।३१।।**

प्रत्येक वस्तू समजण्याकरीता बुध्दी भारी मिळाली आहे व कोणतेही वस्तू प्राप्त करण्याची हिंमत खूप आहे.अशी तनात मोठी अक्कल व हिंमत असल्या कारणाने सतस्वरुप रामाचे रटन करायचे आहे हे समजून गेला आहे तरीही स्मरण करत नाही असा अक्कलवाला हिंमती पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।३१।

**जाण बुझ हर जो तजे ।। ता कुं फिट धकार ।।**
**आघो हुय सुखराम कहे ।। पीछे पड़े गिवार ।।३२।।**

रामजीला समजून गेला व समजून रामजीचे स्मरणही करतो आहे व असे स्मरण करण्यात पुढे पुढे ही राहतो परंतु काही वेळानंतर समजल्यानंतरही मागे हटून जाणून बुजून मध्येच स्मरण करणे त्यागून देतो असा मनुष्य गवार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.अशा गवार मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।३२।।

**चर्चा सुण मन प्रगळे ।। अग्या लीजे जाय ।।**
**धक धक सो सुखराम कहे ।। ढील करे घर आय ।।३३।।**

केवली संताकडून महासुखाच्या पदाची चर्चा ऐकतो व मन मायेपासून निघून सतस्वरुपात लागतो व सतस्वरुप प्राप्त करण्याची चाहणेने सतगुरुकडून आज्ञाही घेतो

व घरी गेल्यानंतर आळस करतो,ढिलाई बर्ताता(दिरंगाई).अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३३।।

**हर की भक्त संमावता ।। डिग पच गोता खाय ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। परखर लोप्या जाय ।।३४।।**

हरची भक्ती पारखून घेतली परंतु धारण करण्यात मन कड्क बनवत नाही,झामग–झामग होऊन करु की नाही करु असे गोते खातो अशा मनुष्याला भक्ती परखल्या–नंतरही धारण करत नाही म्हणून धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३४।।

**आगो पीछो होय रयो ।। अग्या लूं के नाय ।।**
**ता कुं ध्रक सुखराम कहे ।। हरी दिस गोता खाय ।।३५।।**

सतगुरुचा शिष्य बनण्यात मागे पुढे होतो म्हणजे सतगुरुची आज्ञा घेऊ की नाही घेऊ या विचारात रामजीच्या दिशेत जाण्यात करडा न बनता गोते खातो अशा मनुष्याला धिक्कार आहे,फिट आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३५।।

**डरतो इण संसार सुं ।। अग्या लहे न कोय ।।**
**ता कुं फिट ध्रकार हे ।। कहे सुखदेवजी तोय ।।३६।।**

सतगुरुच्या ज्ञानाला मानतो परंतु संसार काय समजेल?घरचे लोक काय म्हणतील? मामाचा परीवार काय समजेल?याचे भय ठेवतो म्हणून ज्ञान समजल्यावरही आज्ञा घेत नाही अशा स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३६।।

**चर्चा सुण आरे करे ।। पत समावे नाय ।।**
**ता कुं ध्रक सुखराम केहे ।। परखर लोप्या जाय ।।३७।।**

संत जनाची ज्ञान चर्चा ऐकून ज्ञान उंच आहे हे अंतरामध्ये समजतो.त्या ज्ञानाच्या सुखाच्या पोहोचचा विश्वासही अंतरमध्ये येऊन जातो तरीही धारण करत नाही.असे ज्ञान पारखून धारण न करणाऱ्या स्त्री पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३७।।

**राम नाम ऊपदेस रे ।। या कुं कहे फितूर ।।**
**ता कुं ध्रक सुखराम कहे ।। वां मुख पडसी धूर ।।३८।।**

जे रामनामाचा उपदेश करतात अशा उपदेशींना सागट लोक,फेल,फितुर,ढोंगी म्हणतात व रामानामाच्या उपदेशाला उथापून देतो अशा सागटांना धिक्कार आहे,धिक्कार आहे तसेच मुखात विष्टेसमान गंधी गंधी धूळ पडेल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३८।।

राम नांव आरे करे ।। ओ पद आद अनाद ।।
ध्रक वा कुं सुखराम कहे ।। रटे जना सूं बाद ।।३९।।

रामनामाला सर्व नामांमध्ये उंच पकडतात व आदि अनादीपासून याच रामनामाने सर्वांचा उध्दार झाला असेही मंजूर करतात परंतु याच रामनाम रटणाऱ्या संतांशी काळाच्या मुखात ठेवणाऱ्या मायेच्या नावाला मोठे पकडून वाद विवाद करतात अशा विवाद करणाऱ्या स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३९।।

रटे जना कूं झूठ कहे ।। राम नाव सत्त होय ।।
ता कुं ध्रक सुखराम कहे ।। सुणो सिष्ट के लोय ।।४०।।

रामनाम सत्य आहे असे वाजवून वाजवून सांगतात व तेच रामनाम रटणाऱ्या संतांना खोटे म्हणतात,ढोंगी म्हणतात.अशा स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे हे सर्व सृष्टीचे लोक ऐका असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४०।।

आप न देख्या देस वो ।। सुण सुण अडे गिवार ।।
ता कुं ध्रक सुखराम कहे ।। सीखर होय खवार ।।४१।।

स्वत:ने पिंडात संत जनांचा देश पाहीला नाही व अन्य संतांची वाणी ऐकून ऐकून देश पाहीलेल्या अनुभवी संतांसोबत अडतो,भांडतो अशा गवाराला धिक्कार आहे,धिक्कार आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अनुभवी संताचे ज्ञान समजून न घेता वाचलेल्या,शिकलेल्या ज्ञानाच्या आधारावर अडतात असे मूर्ख मनुष्य आपल्या मनुष्य देहाची खराबी करतात हे सर्व स्त्री–पुरुष ऐकून घ्या. ।।४१।।

साखी सब्दी सीख कर ।। अड़े संत सुं कोय ।।
ता कुं ध्रक सुखराम कहे ।। गयो जमारो खोय ।।४२।।

अमरलोकात पोहचलेल्या संताची वाणी,साखी,शब्द,शिकून शिकून काही लोक सतस्वरुप प्रगट रुपाने प्रगट आहे अशा संतांशी अडतात अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.अशा मनुष्याने आपला हिऱ्यासारखा मुश्किलीने प्राप्त केलेला मनुष्य देह गमवून दिला असे जगाच्या सर्व स्त्री–पुरुषांनी समझा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।४२।।

अर्थ भेद जाण्या बिना ।। थाप उथापे कोय ।।
ध्रक वा कूं सुखराम कहे ।। सिख ग्यान जन होय ।।४३।।

सतस्वरुपाचा भेद प्राप्त केल्याविना सतस्वरुप प्राप्त केलेल्या खऱ्या संतांचे ज्ञान खंडन मंडण करतात व मागे झालेल्या संतांच्या ज्ञानाला शिकून शिकून मागच्या संतांच्या सारखे संत बनने चाहतात अशा सतस्वरुपाचा भेद प्राप्त न झालेल्या मनुष्याला धिक्कार

आहे,धिक्कार आहे. ।।४३।।

**साचा जन कूं उथपे ।। अड़ग बड़ग करे ग्यान ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। परख करे न आन ।।४४।।**

जे बंकनाळेने चढून दहाव्याद्वारी पोहचलेले खरे संत आहे व त्यांना समजून पारखत नाही त्यांच्या अनुभवांना व ज्ञानाला खोटे ठरवतो आणि आपल्या मनाने व मताने अड्गा बड्गा म्हणजे भ्रमांनी भरलेले ज्ञान म्हणजे ज्यात केवलचे थोडेसेही नामो निशाण नाही असे ज्ञान कथतो म्हणून अशा स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।४४।।

**जोड़ जोड़ कर कहत हे ।। साखी शब्द बणाय ।।**
**ध्रक मीन्डे सुखराम कहे ।। जे अणभे सूं लाय ।।४५।।**

अणभय देश पाहिला नाही व मनानेच साखी,शब्द जोडून जोडून खऱ्या संतांचे अणभय देशाचे शब्द,वाणी सारख्या बनवून खऱ्या संतांचे वाणी,शब्दाच्या बरोबरीत मांडतो अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।४५।।

**बेहद की बाताँ कहे ।। साध समाधी गाय ।।**
**ता कुं ध्रक सुखराम कहे ।। चारण जेसा ठेराय ।।४६।।**

बेहद म्हणजे समाधीमध्ये पोहचलेल्या साधूंची चांगल्या सुरांमध्ये पद,साख्या गाऊन गाऊन जगाला ऐकवतो व गाणारे मनुष्य स्वत:ला बेहदचा साधू समजून बसतो यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे नर बेहदी साधू नाही.हा जगाबरोबरचा मनुष्य आहे व जगात इतिहासात घडलेल्या राजा लोकांचे बखाण करणारा जसे चारणभाट असतात असे इतिहासात झालेल्या संतांचे बखाण करणारा चारणभाट आहे. जगात घडलेल्या संतांचे बखाण करतो आहे.परंतु स्वत: इतिहासात झालेल्या बनलेल्या संतांसारखे बनण्याची विधी शोधत नाही म्हणून अशा पुरुषाला/नराला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४६।।

**जे पूंता समाध घर ।। मिल्या ब्रम्ह मे जाय ।।**
**वा जन कूं सुखराम कहे ।। ध्रक माने नही आय ।।४७।।**

जे संत समाध घर म्हणजे सतस्वरुप ब्रम्हच्या घरी जाऊन सतस्वरुप ब्रम्ह सारखे बनतो.अशा संताला जे स्त्री–पुरुष मानत नाही त्यांच्या मनुष्य जन्माला धिक्कार,आहे धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४७।।

**हरजन चढ़ अस्मान मे ।। बोलत निर्भे ग्यान ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। जे नही करे बखाण ।।४८।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।



जे हरीजनासारखे आकाशात चढून हरीच्या देशाचे निर्भय म्हणजे काळाच्या भयाच्या पलीकडचे ज्ञान जगात कथतात.अशा हरीजनाची पोहोच ऐकवल्या–वरही जे स्त्री–पुरुष त्या हरीजनाची महिमा करत नाही त्यांच्या मनुष्य जन्मास धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४८।।

**इत ऊत अंछर लाय कर ।। साखी कहे बणाय ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। जन होय बेसे आय ।।४९।।**

इतिहासात घडलेल्या ने:अक्षरी वेगवेगळ्या संतांची आपल्या माया मताने त्यांचे व आपले अक्षर जोडून जोडून साख्या,कविता बनवतो व जगात त्या संतांसारखे संत बनून बसतो अशा स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।४९।

**शब्द भेद जाणे नही ।। साख कवत केहे जोड़ ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। रहे जनासू तोड ।।५०।।**

संताच्या सारखा ने:अक्षराचा भेद जाणत नाही व आपल्या तुच्छ बुध्दीने ने:अक्षरी संतासारख्या साख्या,कविता जोडतो व अनुभवी संतापासून तुटून आपला वेगळा पंथ चालवितो अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।५०।

**कवत साख असी कहे ।। जैसी कही कबीर ।।**
**ध्रक वां कू सुखराम कहे ।। सिष्ट बांध के बीर ।।५१।।**

जगात कबीर साहेब ने:अक्षरी संत १४५० च्या जवळपास झाले.ते अमरलोकात सिधाये. त्यांच्या मुखाने सांगितले कवित,साख जगात मागे राहिल्या आहेत.अशा कबीर साहेबाच्या तसेच कबीर साहेब सारखी कवित साख्या बनवून बनवून कोणी मनुष्य जगात सांगतो.तो मनुष्य सृष्टीत जसे कोणी मनुष्य पोट भरण्याकरीता शस्त्र बांधून वीर पुरुषासारखे सोंग बनवितो व जगात सोंग घेऊन घेऊन फिरतो.असा कवित, साख्या बनविणारा मनुष्य कबीर साहेबाचा सोंगी मनुष्य आहे अशा मुनष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५१।।

**पूंथा बिन बाणी कहे ।। ता कूं फिट ध्रकार ।।**
**छायां ले सुखराम कहे ।। कथणी कथे गिवार ।।५२।।**

समाधी घटात पोहचल्या विना संतांची वाणी वाचून वाचून समाधी संतासारखे संत बनू वाणी सांगतो.त्याला पण धिक्कार आहे.असे जे जे मनुष्य संतांच्या वाणीचा आसरा घेऊन वाणी सांगतात ते मूर्ख आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.

।।५२।।

षट कंवळ पुर्व दिसा ।। छे पिछम का खोल ।।
गढ़ पर चढ सुखराम कहे ।। अणभे बायक बोल ।।५३।।

घटात सहा पूर्वेचे कमळ छेदून पश्चिमच्या रस्त्याने उलटून पश्चिमचा रस्ता उघडतो व पश्चिमच्या रस्त्याचे सहा कमळ छेदन करुन दहाव्याद्वाराच्या गढावर चढतो व काळाचे भयरहीत वचन बोलतो.ते संत धन्य आहे,धन्य आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५३।।

द्वादस कंवल न छेदिया ।। उलट चढया नही कोय ।।
ता कूं ध्रक सुखराम कहे ।। शब्द कहत हे जोय ।।५४।।

घटात बारा कमळ छेदन करुन उलटून उलट दहाव्याद्वारात गडावर चढला नाही व दहाव्याद्वारात चढलेल्या संतांसारखे शब्द अन्य संतांच्या सांगितलेल्या ज्ञानाला पाहून सांगतो त्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५४।।

पहुँच्या बिना बाणी करे ।। निर्भे शब्द उचार ।।
ता कूं ध्रक सुखराम कहे ।। आगे पडसी मार ।।५५।।

निर्भय देशास पोहचल्या विना निर्भय देशाचे शब्द उच्चारण करतो व निर्भय देशाचा संत बनून गेला असे आपल्या मनानेच मानून घेतो अशा मनुष्याला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५५।।

भजन बंदगी भेद नही ।। साखां कहे अनेक ।।
ता कूं ध्रक सुखराम कहे ।। फूस पिछाटे देख ।।५६।।

साहेबाची भक्ती,भजन कसे करायचे ही विधी माहीत नाही व घटात साहेब प्राप्त केलेल्या संतांच्या साख्या आठवण करुन करुन घटात साहेब मिळेल या आशेने साहेब प्राप्त केलेल्या संतांच्या साख्या आठवण करत राहतो व त्या साख्यांमध्ये लिन होऊन राहतो व विचार करतो की मला साख्या आठवण केल्याने साहेब मिळेल यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तो मनुष्य क्षुधा निवारण्याकरीता क्षुधा निवारणार्थ लागणारे दाणे ज्यात नाही अशा भुश्याला दाणे प्राप्त करण्याकरीता पाखडण्यासारखे आहे. अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।५६।।

दत्त गोरख के शब्द को ।। बूझ्यां अर्थ न होय ।।
ता कूं ध्रक सुखराम कहे ।। निर्भे बोलत जोय ।।५७।।

दत्तात्रय व गोरक्षनाथाने बनविलेले शब्द गात राहतो व त्या शब्दांची पोहोच कुठपर्यंत आहे हे विचारल्यावर पोहोच सांगू शकत नाही.दत्तात्रय व गोरक्षनाथ काळाच्या

पलिकडे पोहचून गेले आहेत ही आपली समज बनवून मी ही दत्तात्रय व गोरक्षनाथा सारखा निर्भय होऊन गेला व आता मला काळ कधी खाणार नाही हे असे समजतो. जेव्हा की सतविज्ञान ज्ञानाच्या समजने दत्तात्रय व गोरक्षनाथ दोन्ही पारब्रम्ह काळाच्या मुखात बसलेले आहेत.हे काळापासून मुक्त झाले नाही.हे दत्तात्रय व गोरक्षनाथाच्या शब्दाने समजते.असे खोटे निर्भय बनणाऱ्या मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५७।।

**घट माही अस्थान हे ।। बूज्यां कही न जाय ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। कहे परचे की लाय ।।५८।।**

घटात कंठामध्ये सरस्वती,हृदयात महादेव–पार्वती,नाभीमध्ये विष्णू–लक्ष्मी असे सर्व बारा स्थान प्रगट केले नाही व संतांचे घटाचे पर्चे वाचून वाचून घटात स्थान पाहिलेल्या संतांसारखे अनुभवी बनून जगात रमत राहतो व शिष्याने घटात स्थान विचारल्यावर प्रगट करु नाही शकत.अशा खोट्या मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५८।।

**बूज्या अर्थ न ऊपजे ।। कहे ठांव चे साख ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। शब्द छाया ले भाख ।।५९।।**

अनुभव न घेतल्या कारणाने शिष्याने विचारल्यावर घटाच्या स्थानांची खरी रचना शिष्याला सांगू शकत नाही परंतु शिष्याने विचारल्यावर स्थानांची रचना सांगण्या करीता अनुभवी संतांच्या साख्या बोलतो व अनुभवी संतांचा आसरा(सहारा)घेऊन स्वत: अनुभवी संतांसारख्या साख्या बोलून बोलून वर्तवणूक करतो.अशी वर्तवणूक करणाऱ्या मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५९।।

**साकी शब्दी कहे रहयो ।। बिना अर्थ बिचार ।।**
**साखां कहे सुखराम कहे ।। सो जड़ बड़ो गिवार ।।६०।।**

मर्म समजल्याविना आधी झालेल्या संतांच्या साख्या व शब्द गातो आणि कोणी साखीचा मर्म विचारला तर साखीचा मर्म सांगू शकत नाही.अशा मनुष्याची बुध्दी भारी जड आहे तसेच तो मनुष्य मोठा गवार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगून राहीले आहे.।।६०।।

**पारब्रम्ह की भक्ति बिन ।। ध्रक करणी करतुत ।।**
**ध्रक मंत्र सुखराम कहे ।। जे हरजी बिन सूत ।।६१।।**

चांगल्या चांगल्या करण्या व करतूत करतो परंतु सतस्वरुप पारब्रम्हची भक्ती प्राप्त करत नाही अशा मनुष्याच्या अकलेला धिक्कार आहे,धिक्कार आहे.ज्या मंत्राने हरी

मिळत नाही असे भारी भारी मंत्र जपतो व हरी प्राप्त करुण्याचा मंत्र जपत नाही अशा मनुष्याच्या अकलेला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।६१।।

**सुणज्यो सब साची कहूँ ।। मोय सतगुरू की आण ।।**
**केवळ बिन सुख राम कहे ।। सब ही झूठ बखाण ।।६२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज शपथ घेऊन जगाच्या स्त्री–पुरुषांना सांगून राहिले की,कैवल्य भक्ती विना सर्व मंत्र,जाप,करण्या,कर्तुत व या सारख्या सर्व मायावी विध्या काळाच्या दु:खातून मुक्त होण्याकरीता खोट्या आहेत.हे सत्य आहे हे सांगण्यात थोडेसेही खोटे नाही हे ऐका. ।।६२।।

**तीन लोक सूं जे रत्ता ।। क्या नर नारी देव ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। पारब्रम्ह बिन सेव ।।६३।।**

सतस्वरुप पारब्रम्हची भक्ती सोडून तीन लोकांच्या देवतांमध्ये तसेच तीन लोकांच्या देवतांची भक्ती सांगणारे साधू–साध्वींमध्ये जे रचूनमचून गेले त्या सर्व स्त्री–पुरुषांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६३।।

**ध्रक ध्रक सो ये पांव हे ।। दरसण कदे न जाय ।।**
**नेंण ध्रक सुखराम कहे ।। रूप न निरख आय ।।६४।।**

जो पायाने चालून सतस्वरुपी गुरु व साधूंचे दर्शण करायला जात नाही त्या पायांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.तसेच जे डोळे सतस्वरुपी गुरु व साधूंचे दर्शन करायला जात नाही त्या डोळ्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।६४।

**ध्रक हात गुरू टेल बिन ।। ध्रक कान वे होय ।।**
**हर चर्चा सुखराम कहे ।। चित कर सुणी न कोय ।।६५।।**

जो हातांनी सतस्वरुपी गुरुची व साधूंची सेवा करत नाही अशा हातांना धिक्कार आहे, धिक्कार आहे.तसेच आपल्या कानांनी चित्त देऊन हरी चर्चा ऐकत नाही अशा कानांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।६५।।

**ध्रक ध्रक बुध वा अकल हे ।। महिमा करे न आय ।।**
**ध्रक मनसो सुखराम कहे ।। गुरू सूं मिले न जाय ।।६६।।**

अक्कल म्हणजे बुध्दी विशाल आहे तरीही सतस्वरुपी सतगुरुची महिमा आपल्या बुध्दीने करत नाही अशा बुध्दीला धिक्कार आहे,धिक्कार आहे.मन सर्वाशी मिलनसार आहे तरीही सतस्वरुपी सतगुरु व साधूंना भेटायला जात नाही.अशा मनाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६६।।

**धक जिभ्या मुख रसना जां की ।। नाव रटे नही कोय ।।**
**धक मत सो सुखराम कहे ।। गुरू धरम पत न होय ।।६७।।**

जे मुख,जीभेने रामनाम रटत नाही त्याच्या मुख तसेच जीभेला धिक्कार आहे,धिक्कार आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याच्या मनात सतस्वरुपी गुरु धर्म नाही.अशा मनाचा धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६७।।

**धक धक खाली जात हे ।। नांव बिणा दम कोय ।।**
**धक दिन सुखराम कहे ।। ता दिन भजन न होय ।।६८।।**

जो श्वास नाव घेतल्याशिवाय खाली जातो अशा खाली जाणाऱ्या दमाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.ज्या दिवशी रामनामाचे भजन होत नाही अशा दिवसाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६८।।

**धक धक वा पोर पल ।। नांव बिसारे सोय ।।**
**धक दहाड़ो सुखराम कहे ।। हरी जन मिले न कोय ।।६९।।**

ज्या पोहर क्षणात रामनाम घ्यायचे विसरुन जातो त्या पोहोर क्षणाला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.ज्या दिवशी हरीजनाशी भेटणे होत नाही किंवा हरीजन भेटत नाही त्या दिवसाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६९।।

**धक धक वांको धन हे ।। गुरू नही पूज्या लाय ।।**
**धक मस्तक सुखराम कहे ।। चरण निवायो नई आय ।।७०।।**

घरात धन अपार आहे.असे अपार धन असल्यावरही सतगुरुला घरी आणून आदर सत्कार करत नाही अशा धनाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.ज्याने आपले मस्तक (डोके)गुरुच्या चरणात नमविले नाही तर त्याच्या मस्तकाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।७०।।

**धक ज्यांको धन माल हे ।। धक बगतावर होय ।।**
**सतगुरू की सुखराम कहे ।। म्हेमा करी न कोय ।।७१।।**

ज्याच्या जवळ धन माल पुष्कळसे आहे व त्या धनमालाचा उपयोग कसा घ्यायचा त्याचा एकमात्र धनी ही तोच आहे म्हणजे धनमालाचा उपयोग काय केले हे विचारणारा घरात कोणीही नाही आहे तरीही आपल्या गुरुला घरी आणून परमात्म्याला आवडेल अशी महीमा करत नाही अशा धनाला व धनाच्या धनीला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।७१।।

**धक तन मन माल सो ।। धक सुख संपत होय ।।**

**सतगुरू कूं सुखराम कहे ।। अर्पण करी न कोय ।।७२।।**

ज्याने आपले तन,मन,धनमाल,सुख–संपदा आपल्या सतगुरुला अर्पण केले नाही म्हणजे सतगुरुच्या गरजेच्या उपयोगात आणली नाही अशा पुरुषाच्या तन,मन,धनमाल व सुख–संपदेला धिक्कार आहे,धिक्कार आहे तसेच त्या पुरुषाला ही धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।७२।।

**ध्रक दाता ध्रक सूर्वा ।। हरी गुर सामा नाय ।।**
**ध्रक किमत सुखराम कहे ।। मन नही पकड्यो जाय ।।७३।।**

कोणी मनुष्य जगाकरीता दाता आहे परंतु हरी सामील तसेच सतगुरु कार्यात दाता तसेच शुरविरतेने राहत नाही अशा मनुष्याच्या दाता व शुरविरतेला धिक्कार आहे, धिक्कार आहे.जो मनुष्य जगाच्या स्त्री–पुरुषाचे मन पकडण्यात हिकमती आहे परंतु सतगुरुचे मन पकडण्यात कधी थोडीशीही हिकमत लावत नाही अशा हिकमतीला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।७३।।

**हरी बिन चर्चा ध्रक हे ।। ध्रक ग्यानी बिना भेद ।।**
**ध्रक बाणी सुखराम कहे ।। गुरू महिमा विन छेद ।।७४।।**

कोणी ज्ञानी हरीच्या चर्चेशिवाय/विना अन्य मायेच्या ज्ञानाची चर्चा करतो.त्याच्या चर्चेला धिक्कार आहे,धिक्कार आहे.तसेच जो ज्ञानी हरीला प्रगट करण्याचा भेद सोडून अन्य मायेच्या सर्व वस्तू प्रगट करण्याचा भेद जाणतो.अशा ज्ञानीलाही धिक्कार आहे, धिक्कार आहे.ज्याच्या मुखाच्या वाणीत मायावी कर्मकांडांचा अंत होत नाही अशी महीमा आहे व गुरुची महिमा थोडीशीही नाही अशा मुखाच्या वाणीला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।७४।।

**ध्रक पढीयो ध्रक सीखियो ।। हरी गुण बिना गिनान ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। बिना घट सील सिनान ।।७५।।**

हरीच्या गुणाचे ज्ञान वाचल्या व शिकल्या विना अन्य कितीही होणकाळाचे ज्ञान वाचून घेतले व शिकून घेतले अशा सर्व वाचण्याला व शिकण्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,ज्याच्या घटात शिल नाही व त्याचे घट व्यभिचाराने भरलेले घट आहे.अशा मनुष्याला पाण्याने पवित्र होण्याकरीता कितीही पवित्र पाण्याने स्नान केले तरीही त्याचे स्नान पवित्र होण्याकरीता व्यर्थ आहे म्हणून अशा व्यभिचारी मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।७५।।

**ध्रक ध्रक सो जाणे घणी ।। ब्रम्ह भेद बिन बात ।।**


**ता सुं ध्रक सुखराम कहे ।। करे जीव सूं घात ।।७६।।**

सतस्वरुप ब्रम्हच्या भेदाविना तीन लोक चौदा भवनाचा एक एक गोष्ट पूर्ण जाणतो अशा जाणकाराला ब्रम्ह भेद न जाणल्या कारणाने धिक्कार आहे,धिक्कार आहे.जो मनुष्य आत्महत्या करतो किंवा कोण्या अन्य मनुष्याला आत्महत्या करायला प्रेरीत करतो.त्यांच्या अशा प्रकारच्या घात करण्याच्या प्रवृत्तीला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।७६।।

**ध्रक तामस ध्रक रीसवा ।। जग कुं तज्यो न आय ।।**
**ध्रक श्रवण सुखराम कहे ।। अनहद सुण्यो न जाय ।।७७।।**

ज्या सतस्वरुपी मायेला आतापर्यत खरे मानत राहिला व ती जगतरुपी माया खोटी आहे हे समजले आणि त्या समजवर राग आला तरीही जगाशी मोह ममता तोड्त नाही व जगाला मोह मायेने त्यागत नाही आणि सतगुरुला धारण करत नाही अशा मनुष्याच्या त्या क्रोधाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जे कान अनहद म्हणजे मुखाने बोलता येत नाही व कागदावर लिहीले जात नाही अशा अनहदरुपी नामाच्या ध्वनीला ऐकत नाही अशा कानांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.।।७७।।

**ध्रक ध्रक हर बिन कोड हे ।। ध्रक बिन भक्ति चाव ।।**
**ध्रक ध्रक सो सुखराम कहे ।। हरी गुरू बिन बहोत भाव ।।७८।।**




ज्याला हरी विना अन्य सर्वांचा कोड आहे व त्या हरीच्या भक्तीशिवाय अन्य भक्तीचे कोड आहे,चाहणा आहे.अशा हर्षला धिक्कार आहे, धिक्कार आहे.हरी आणि सतगुरु शिवाय तीन लोक चवदा भवनाचे सर्व देवता व गुरुशी खूप प्रेमभाव आहे.अशा प्रेमभावाला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।७८।।

**ध्रक ध्रक ईमस छोवो ।। चड़े करम पर नाय ।।**
**ध्रक चित्त मन सुखराम कहे ।। पवन गहे नई माय ।।७९।।**

ज्या मायेच्या सुखांवर नाराजी आली व साहेबाच्या सुखांची चाहणा झाली तरीही मायेचे सुख देणाऱ्या कर्मकांडांवर चढला नाही म्हणजे कर्मकांडांना थांबवले नाही अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.साहेबाची चाहणा झाल्यावर ही चित्तमनाने रामनामासोबत घटात खोलवर श्वास भरला नाही अशा चित्तमनाला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।७९।।

**ध्रक ध्रक जो रंग राग हे ।। ध्रक कीणो कंठ होय ।।**
**ता सु सुण सुखराम कहे ।। हरजस करे न कोय ।।८०।।**

ज्याची राग रागीणी खूप चांगली आहे व त्याचा कंठ ही खुप सुरेल आहे व अशा सुरेल कंठाने राग रंगात काळाच्या मुखात ठेवणाऱ्या मायावी देवतांचे यश गातो परंतु काळापासून करविणाऱ्या हरीचे यश गात नाही अशा राग रंगात गाणाऱ्या कंठाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८०।।

**धक धक कंठ हरजस बिना ।। सुणज्यो रे सब कोय ।।**
**धक मन्डळी सुखराम कहे ।। बिन सिव्रण जो होय ।।८१।।**

कंठ चांगला आहे आणि त्या कंठाने हरीयशांचे म्हणजे युगायुगापासून पडलेले भ्रम काढणारे व हरीच्या देशाचे सुख सांगणाऱ्या ज्ञानाचे पद,साख्या गात नाही अशा कंठाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.हे सर्व जगाचे स्त्री–पुरुष ऐका.जेथे जेथे मंडळी जमा होते व ती मंडळी हरीच्या स्मरणाशिवाय हरी न प्राप्त करुणाऱ्या अन्य व्यर्थ गोष्टीमध्ये किंवा राग रागीणीत रंगतात अशा हरीचे स्मरण न करणाऱ्या मंडळीला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८१।।

**ज्यां मन्डळी भेळी हुवे ।। भजन बंदगी नाय ।।**
**धक धक सो सुखराम कहे ।। वा मुर्ख क्यूं जाय ।।८२।।**

जेथे जेथे मंडळी जमा होते व रात्र रात्रभर किर्तन पुजन करत राहतात परंतु हरीचे भजन भक्ती करत नाही अशा सर्व जमा होणाऱ्या मंडळींना धिक्कार आहे,धिक्कार आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशा मंडळीत जाणारा मनुष्य मूर्ख आहे म्हणून त्या मुनष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८२।।

**इत उत सूं भेळा हुवे ।। नर नारी सुण लोय ।।**
**धक धक सो सुखराम कहे ।। सिंव्रण करे न कोय ।।८३।।**

येथून तेथून स्त्री–पुरुष कोण्या जागेवर एकत्रित होतात.एकत्रित झाल्यावर हरीचे स्मरण करत नाही व अन्य काळाच्या चक्रात टाकणारी फालतू गोष्टी करुतात.असे एकत्रित झालेल्या प्रत्येक स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८३।।

**धक धक सो जुग जाणीये ।। जामे नही औतार ।।**
**धक सतगुरू सुखराम कहे ।। जे जीव लगे नही पार ।।८४।।**

ज्या युगात भवसागरातून तारणारे सतस्वरुप संत अवतार प्रगटत नाही अशा युगाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.सतगुरुची पदवी लावून जगात रमतात व शिष्याच्या शिष्य

बनवतात.परंतु एकही शिष्य भवसागरातून पार नाही करु शकत.अशा सतगुरुच्या नावाचा प्रयोग करुन जीवाला काळाच्या मुखात अटकवून ठेवणाऱ्या मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८४।।

**धक धक मंडल देस वो ।। ज्यां पहुँता सन्त न होय ।।**
**धक बस्ती सुखराम कहे ।। जीव न जागे कोय ।।८५।।**

ज्या देशात किंवा अनेक देशाच्या समूहाने बनलेल्या मंडळात पूर्वेचे सहा व पश्चिमेचे सहा कमळ छेदन करुन सतस्वरुपात पोहोचलेला संत नाही अशा मंडळ किंवा देशाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.अशा मंडळ किंवा देशाच्या ज्या वस्तीत मायेतून निघून परममोक्षात जाण्याकरीता जीव जागृत नाही होतात अशा वस्तीला धिक्कार आहे, धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।८५।।

**धक नगर धक सहेर वो ।। ज्यां मे सती न होय ।।**
**ता सूं धक सुखराम कहे ।। राम रटे नही कोय ।।८६।।**

त्या नगर किंवा शहराला धिक्कार आहे ज्यात सती म्हणजे येणाऱ्या अतिथीला मान–सन्मान करणारा आणि जे काहीही मागेल ते देणारा पुरुष राहत नाही आणि सती म्हणजे पतीव्रता स्त्री राहत नाही त्याच्याहून ही अधिक धिक्कार त्या नगर म्हणजे शहराला आहे जेथे राम रटणारा एकही हंस नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८६।।

**धक मन्डल ज्यां साध नही ।। धक बस्ती बिन दास ।।**
**धक द्वारो सुखराम कहे ।। नही भक्त की प्यास ।।८७।।**

ज्या वस्ती तसेच मंडळात सतस्वरुपी साधू नाही अशा वस्तीला मंडळाला धिक्कार आहे तसेच वस्ती व मंडळात साधू आहे परंतु एकही दास म्हणजे शिष्य नाही असे दास न बनण्याच्या स्वभावाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.जगात भक्तीला राहण्या करीता लहान मोठे अनेक द्वार बनलेले आहे परंतु अशा द्वारामध्ये केवली भक्त यावे, थांबावे,ज्ञान करावे,जीवांना भवसागरातून पार करावे अशी त्या द्वारांच्या मालकात तहान नाही अशा सर्व द्वारांना,मालकांना धिक्कार आहे,धिक्कार आहे.तसेच ज्या घरांमध्ये केवली संतांची तहान नाही अशा सर्व घरांना धिक्कार आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।८७।।

**धक धक कुल धक जात वा ।। ज्यां मे संत न होय ।।**
**धक मेहरी सुखराम कहे ।। हरी जन जण्यो न कोय ।।८८।।**

ज्या कुळ तसेच जातीत सतस्वरुपी संत नाही अशा कुळ व जातीला धिक्कार आहे, धिक्कार आहे.ज्या स्त्रीने हरीजनाला जन्म दिला नाही अशा स्त्रीला धिक्कार आहे,

धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।८८।।

**ध्रक ध्रक बस्ती ध्रक गाँव वो ।। ज्यां हरी चर्चा नाय ।।**
**ध्रक घर सो सुखराम कहे ।। अेक न सुणणे जाय ।।८९।।**

ज्या गाव व वस्तीला धिक्कार आहे जिथे हरीचर्चा होत नाही तसेच त्या घराला धिक्कार आहे ज्या घरात एकही जीव सतस्वरुपी साधूची सतसंगत ऐकायला जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।८९।।

**ध्रक ध्रक म्रतक ध्रक हे ।। जे नर रोवे नार ।।**
**ध्रक जामण सुखराम कहे ।। हरक न हुवो बिचार ।।९०।।**

मृतकाच्या मागे जे स्त्री–पुरुष रडतात अशा स्त्री–पुरुषाला तसेच मृतकाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.ज्याला मनुष्य जन्म प्राप्त करण्याचा आनंद होत नाही अशा मनुष्याच्या जन्माला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९०।।

**ध्रक नर जग मे ध्रक हे ।। मूंवा कूं दे बांग ।।**
**ता सुं ध्रक सुखराम कहे ।। अमल तमाखुं भांग ।।९१।।**

त्या मनुष्याला संसारात धिक्कार आहे जो मनुष्य मृतकाला बांग देऊन म्हणजे नावाने हाक मारुन रडतात तसेच त्याच्याहून ही अधिक त्या मनुष्याला धिक्कार आहे तो आफीम,तंबाखू,भांग सेवन करतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९१।।

**ध्रक बस्ती ध्रक बास घर ।। जां हर भक्ती नाय ।।**
**ध्रक मुर्दो सुखराम कहे ।। पाँव पसार्‍या जाय ।।९२।।**

जेथे हरी भक्ती नाही अशा वस्तीला म्हणजे निवास तसेच घराला धिक्कार आहे, धिक्कार आहे.ज्या मुदर्याला बैठकी बनवून घेऊन न जाता तिरडीवर पाय पसरवून झोपवून घेऊन जातात अशा मुदर्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९२।।

**ध्रक ध्रक जां घर सोग रे ।। ध्रक बड़ ले सो नार ।।**
**ध्रक मुवा कूं रोईये ।। सुखदेव तके गिंवार ।।९३।।**

सर्व जीव आधीपासून पारब्रम्ह होणकाळात राहत होते.तेथे सुख दु:ख नव्हते.जीवाला सुखाची चाहणा होती.त्या चाहणांना लक्षात(ध्यानात)ठेवत परमात्माने सृष्टीची रचना केली व प्रत्येक जीवाला वेगवेगळे मनुष्य देह देऊन धरतीवर पाठवले.या मनुष्य देहाने पाच आत्म्याचे सुख घेऊ शकेल व सुख घेता घेता मोठ्या सुखाच्या अमर देशात सहजपणे व लवकरात लवकर जाता यावे अशी जीवावर दया करुन देहाची रचना

जीवाला बनवून दिली.येथील सुखात जास्त न रमता व जितक्या लवकरात लवकर अमरलोकात जाता याचे अशी साहेबाची चाहणा होती.परंतु जीव येथे मायेमध्ये आल्यानंतर मोठ्या सुखाच्या देशात जाण्याची तयारी न करता येथेच काळाच्या दु:खाने भरलेल्या मायेच्या सुखात खूप रमतो.या देशात रमणे व लवकरात लवकर महासुखात जाणे या हेतुला ध्यानात ठेवून जगात रमता रमता हाताने केलेले कर्म भोगून अमरलोकात पोहचावा म्हणून परमात्मा प्रत्येक जीवाला मायेचे ही जास्तीत जास्त सुख मिळावे व काळाचे दु:ख कमीत कमी पडावे व जीव लवकरात लवकर अमर लोकाच्या सुखात जावे.अशी सर्व सोच विचार करुन जीवांना वेगवेगळ्या जागी जन्म देतो.जेथे एका आईवडीलांपासून देह मिळतो.त्याला प्रत्येक जीव आपल्या मोह ममता या अज्ञानाच्या कारणाने आपले कुळ आहे व सदा राहतील अशी समज बनवितो.अशा कुळात कोणतेही दु:ख पडले तर कुळाचा प्रत्येक जीव दु:खाने व्याकुळ होतो.तो जीव हे नाही समजत की मला मिळालेला मनुष्यदेह अमरलोकात जाण्या-करीता मिळालेला आहे व हे कुळ माझ्या कर्माच्या घेण्या-देण्याचे बदले भोगून निर्मळ बनविण्याकरीता मिळाला आहे.जसे परमात्म्याने कोण्या एका कुळात मनुष्य जन्म दिला तसे तोच परमात्मा जीवाचे लवकरात लवकर कर्म कापून या कुळातून काढून जेथे बदले आहे तेथे बदले चुकविण्याकरीता पाठवत राहतो.अशी त्याची भारी कृपा जीव समजत नाही उलट कुळाचा कोणी मनुष्य मरुन गेल्यावर साई(परमात्मा)ला दोषी ठरवतो व साईने आमच्यावर मोठी कृपा केली असे समजतो व घराचे सर्व जीव जाणाऱ्या जीवाच्या मागे रडून रडून दु:ख मनवितात व घराच्या स्त्रीया रात्री ३ वाजेला उठून उठून आपल्या छातीवर मार देऊन देऊन दु:ख मनवितात व रात्रंदिवस रडतात. अशा सोग करणाऱ्यांना,बड घेणाऱ्या स्त्रीयांना व मुर्दाच्या मागे रडणाऱ्या स्त्री-पुरुषांना आदि सतगुरु सुखरामजी महाराज गवार म्हणतात व मूर्ख म्हणतात व त्यांना धिक्कार आहे,धिक्कार आहे असे सांगत आहे.।।९३।।

**ध्रक आरो ध्रक ब्याव वो ।। जहाँ जन जीम्या नाय ।।**
**ध्रक जाती सुखराम कहे ।। बिन देह देवल जाय ।।९४।।**

प्रत्येक घरात शरीर सुटल्यानंतर बारवे किंवा तेरवे करतात.त्या बारवे किंवा तेरव्याला राजस्थानी लोक आरा म्हणतात.अशा बारवे किंवा तेरव्यात म्हणजे आरामध्ये (आऱ्यामध्ये)संतस्वरुपी संताला मोठ्या आदरासोबत बोलावून त्याची विधी विधीने महिमा करुन भोजन नाही करवले गेले तर ते बारवे किंवा तेरावे हा देह सोडून जाणाऱ्या जीवाला काळाच्या तापापासून करण्याकरीता फळहीन राहते म्हणून अशा फळहीन बारवे,तेरव्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी

महाराज सांगत आहे.असेच विवाहात सतस्वरुप संताला आदर भावाने बोलवून बोलवून त्याची विधी विधी गाजा वाज्यासोबत महिमा करुन भोजन करविले नाही तर तो विवाह वैवाहिक जीवनात मोठ्या देशावरचे सुख देण्यात फळहिन राहतो.म्हणून अशा फळहिन विवाहाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.जो यात्री ज्या देऊळात परमात्मा प्रगट केलेले संत नाही व मनुष्याने बनविलेल्या मायावी मूर्त्या आहे त्यांच्या दर्शनासाठी कष्ट भोगून भोगून जातो अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९४।।

**धक तीर्थ धक धाम वो ।। जल बिन ही निवास ।।**
**धक जाती सुखराम कहे ।। ममता बुझी न आस ।।९५।।**

ज्या तिर्थ धामात जाणाऱ्या यात्री करीता पिण्याकरीता पाणी तसेच राहण्याकरीता निवास राहत नाही.अशा तिर्थधामाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.तसेच तेथे जाणाऱ्या तिर्थ यात्रींनाही ममता,आशा मिटत नाही उलट ममता,आशा उभरते व यात्रीला सतविते म्हणजे यात्रीची ममता,आशा मिटविण्याकरीता ममता,आशा मिटविणारे संत त्या तिर्थावर राहत नाही म्हणून अशा तिर्थधामाला व तिर्थधाम जाणाऱ्या मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।९५।।

**धक धक भक्त न परख ले ।। सतगुरू करे न कोय ।।**
**धक गुरू बिन सुखराम कहे ।। रामस्नेही होय ।।९६।।**

जो सतस्वरुपी भक्ताला पारखत नाही व पारखून त्या सतस्वरुपी भक्ताला सतगुरु करत नाही अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.घटात रामनाम प्रगट केलेल्या गुरुला धारण करत नाही व आपल्या मतानेच ने:अक्षर म्हणजे परमात्मा प्रगट करण्या करीता रामनाम घेतो व सर्व प्रयत्न केल्यावरही गुरुकडून भेद न मिळाल्या कारणाने घटात परमात्मा प्रगट होत नाही अशा मनुष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे.

जसे झाडाला फळ लागते.झाड आपल्या मुळांद्वारे मुळांच्या जवळच्या जल प्रवाहातून




पाणी पिते व पिलेले पाणी फळाला देते व फळाला पूर्ण करुन रसदार गोड करते.फळ आपल्या अज्ञानापोटी असा विचार करतो की झाड मुळांकडून पाणी पितो व पिऊन मला देतो असे न करता हे पाणी बरोबर माझ्या खालीच आहे मग मी त्यात कुदून पाणी पिऊ शकतो व लवकर जाड व रसदार होऊ शकतो.या अज्ञानाने फळ झाडाचा आसरा(सहारा)त्यागून देतो व पाण्यात उडी मारुन रसदार बणण्याची आशा करतो तर बनत नाही उलट सडून जातो.अशाच प्रकारे जो मनुष्य सतगुरु न करता राम सर्वांमध्ये आहे मग माझ्यातही

आहे हे समजून रामस्नेही बनतो.परंतु रामस्नेही बनल्यानंतरही घटातील सहा पूर्वेचे व सहा पश्चिमेचे कमळ छेदून सतस्वरुपाच्या देशात जाऊ शकत नाही व मायेचे पर्चे चमत्कार प्राप्त करतो व काळाच्या मुखात पडलेला राहतो असे मनानेच विचार करुन बसणाऱ्या रामस्नेहीला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९६।।

**कान फुंका गुरू हद का ।। वां सु रहे उलझाय ।।**
**तासूं ध्रक सुखराम कहे ।। सतगुरू करे न आय ।।९७।।**

मनुष्य देह ४३,२०,००० वर्षानंतर सतगुरु करुन मोक्षात जाण्याकरीता मोठ्या मुश्किलीने मिळतो अशा एक मनुष्य देहात येऊन घटात साहेबाचे पर्चे प्रगट करुन देणारा सतगुरु करत नाही व कनफुंके(कान फुंकणारे)गुरु करुन मायेचे घटाच्या बाहेरचे पर्चे शिकतो व शिकून शिकून पर्चे करण्यात उलझून जातो अशा शिष्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।९७।।

**झूठे गुरू सूं लागा रहे ।। ता कूं फिट ध्रकार ।।**
**सतगुरू कुं सुखराम कहे ।। समजर तजे गिवार ।।९८।।**

सतगुरुला समजूनही सतगुरु त्यागून देतो व मोक्षाचा रस्ता न जाणणाऱ्या व मायेचे पर्चे चमत्कारात अटकविणाऱ्या खोट्या गुरुशी लागून राहतो त्याला धिक्कार आहे,धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९८।।

**साचा सतगुरू सो सही ।। उलट चडे. अस्मान ।।**
**दूजा सब सुखराम कहे ।। झूठा गुरू बखाण ।।९९।।**

खरे सतगुरु ते समजायचे जे घटात बंकनाळेच्या रस्त्याने आकाशात चढून गेले आहेत व शिष्याला ही चढवून देतात व सतगुरु बनून बसले आहेत.परंतु बंकनाळेच्या रस्त्याने आकाशात चढले नाही किंवा आकाशात चढण्याची विधी जाणत नाही ते खोटे गुरु आहेत. असे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।९९।।

**हरजी को सिवरण करे ।। जन सुं धेक विचार ।।**
**ता कूं ध्रक सुखराम कहे ।। दर्गा पड़सी मार ।।१००।।**

खरे सतगुरु ते समजायचे जे घटात बंकनाळेच्या रस्त्याने आकाशात चढून गेले आहेत व शिष्याला ही चढवून देतात व सतगुरु बनून बसले आहेत.परंतु बंकनाळेच्या रस्त्याने आकाशात चढले नाही किंवा आकाशात चढण्याची विधी जाणत नाही ते खोटे गुरु आहेत.असे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।१००।।

**भजन भाव भक्ति बिना ।। ध्रक ध्रक क्या नर नार ।।**

सब परले का जीव हे ।। सुखदेव कहे विचार ।।१०१।।

रामनामाची भजन भक्ती नाही व घटात रामनाम प्रगट करुन देणाऱ्या सतगुरुशी प्रेमभाव नाही अशा सर्व स्त्री–पुरुषाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.हे सर्व जीव प्रलयात जाणारे जीव आहेत म्हणजे काळाच्या जन्म–मरणाच्या चक्रात अटकून गेलेले जीव आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.।।१०१।।

।। इति श्री मद भागी धक धक ता को अंग संपूरण ।।